Five Days Workshop on
" Gender Orientation"

Date: 9-13 Feb 2015

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

द्वारा आयोजित

# लिंगभाव प्रबोधन कार्यशाळा

## Gender Orientation Workshop

दिनांक : ९ ते १३ फेब्रुवारी २०१५

महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये लिंगभाव संवेदनशीलता निर्माण व्हावी तसेच स्त्री अभ्यास या नविन आंतरविद्याशाखीय विषयाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी या उद्देशाने ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे लिंगभाव प्रबोधन कार्यशाळेचे (Gender Orientation Workshop) आयोजन करण्यात येत आहे.

- कार्यशाळेकरीता महाविद्यालयात नावनोंदणी करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थी प्रवेश क्षमता - ३०
- पात्रता - पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थी
- पुर्णवेळ उपस्थित सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल.

**कार्यशाळा समन्वयक :** निर्मला जाधव मो. ९१५८७८८३४९

**कार्यशाळा सहाय्यक :** मंजुश्री लांडगे मो.८८०६६०३३४४ अश्विनी मोरे मो. ९४०५३४२१८५

**विनीत**

**डॉ. चेतना सोनकांबळे**
**संचालक**
**ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र**

**प्राचार्य**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद**

**स्थळ**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद**

# लिंगभाव प्रबोधन कार्यशाळेचे उद्‌घाटन

**दि. ९-२-२०१५**

ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात पाचदिवसीय लिंगभाव प्रबोधन कार्यशाळेचे (Gender Orientation Workshop) आयोजन करण्यात आले आहे. सदरील कार्यशाळेचे उद्‌घाटन आज (दि.९) प्राचार्य डॉ. किशोर साळवे आणि ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. चेतना सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

उदघाटनपर भाषणात डॉ. सोनकांबळे म्हणाल्या की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये लिंगभाव संवेदनशीलता निर्माण व्हावी या उद्देशाने विविध महाविद्यालयांमध्ये लिंगभाव प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. सदरील कार्यशाळेत लिंगभाव, पितृसत्ता, स्त्रीचळवळ, स्त्रिया आणि काम, स्त्रिया आणि विकास, प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया, लिंगभाव आणि इतिहास इ. स्त्रीविषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच सदरील विषयांशी संबंधित माहितीपट व चित्रपट दाखविण्यात येणार आहेत.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. साळवे म्हणाले की, मुला-मुलींमध्ये लिंगभावाधारित समाजिकरण केले जाते. समाजात स्त्री-पुरुष समता प्रस्थापित होण्याकरीता अशा प्रकारच्या कार्यशाळांची मदत होईल. सदरील कार्यशाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे अवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. निर्मला जाधव यांच्यासह महाविद्यालयीन समन्वयक प्रा.शामकुंवर मॅडम, प्रा. बुध्दवंत मॅडम, प्रा. बढे उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वितेकरीता स्त्री अभ्यास केंद्रातील मंजुश्री लांडगे, अश्विनी मोरे, ललित भवरे, किशोर उघडे, डॉ. सविता बहिरट, संतोष लोखंडे, संजय पोळ आदीं परिश्रम घेत आहेत.

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

Gender Orientation Workshop (9-3/02/2018)









कला व वाणिज्य महाविद्यालय
ाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
राबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र
लिंगभाव प्रबोधन
nder Orientation